वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## बीड न.प.मध्ये १३ उमेदवार बारावीपर्यंत, ३ पदवी, ४ पदव्युत्तर पदवीधारक

# निवृत्त नायब तहसिलदार, डॉक्टर, वकिल अन् पदवीधारक रिंगणात

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता




बीड, (दिव्य न्युज):- बीड नगर परिषदेची निवडणूक जिल्ह्यात चर्चेची ठरत आहे. एससी प्रवर्गातील महिलेसाठी पहिल्यांदाच बीड नगर परिषदेचे अध्यक्षपद राखीव झाले आहे. मात्र उमेदवारी देताना घडलेल्या घडामोडींमुळे बीडकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### बीड पालिका निवडणूक रिंगणात हे १९ उमेदवार

संगीता वाघमारे पदवी (वय ४९), दिव्या स्वामी उच्च पदवी (वय २४), कोमल वाघमारे नववी (वय २४), प्रियंका वडमारे १२ वी (वय ३५), रजनी कांबळे पदवी (वय ३९), राधिका मुने दहावी (वय ५४), करूणा म्हस्के उच्च शिक्षण (वय ४७), विद्या पवार उच्च पदवी लॉ. (वय ४१), प्रणिता पवार पदवी (वय ३४), मंगल थोरात पाचवी (वय ४३), वृषाली जायभाये दहावी (वय ५१), तोळणबाई गोरे अशिक्षीत (वय ५८), हिराबाई कांबळे ५ वी (वय ४५), सुरेखा श्रृंगारे ९ वी (वय ३३), ज्योती घुमरे उच्च पदवी आरोग्य (वय ४८), सारिका जोगदंड ५ वी (वय ३७), प्रेमलता पारवे बारावी (वय ६३), स्मिता वाघमारे १० वी (वय ६१) तर सुषमा जोगदंड १२ वी (वय ३३).

### अनेक वार्डामध्ये क्रॉस वोटींगची शक्यता

आपल्या वार्डात उभा असणारा नगर सेवक हा आपल्या जवळचा असतो. त्याच्याशी असलेले संबंध नागरिकांच्या दृष्टीकोनातून महत्वाचे असतात. त्यामुळे वार्डात उभ्या असलेल्या उमेदवाराचा पक्ष सहसा पाहिला जात नाही. वार्डात व्यक्ती पाहून मतदान केले जाते हा आजपर्यंतचा अनुभव आहे. मात्र नगराध्यक्ष पदासाठी तिसरे मतदान करायचे आहे. हे मतदान करत असतांना मात्र नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला क्रॉस वोटींग होऊ शकते. म्हणजेच एखादा मतदार वार्डात एका पक्षाला आणि नगराध्यक्ष पदासाठी दुसऱ्या पक्षाला मतदान देऊ शकतो.

### ४० ते ५० वयोगटाचे ६

नगराध्यक्षपदाच्या १९ उमेदवारांपैकी २० ते ३० वयोगटांच्या दरम्यान २ उमेदवार आहेत. तर, ३० ते ४० वयोगटात ५ उमदेवार आहेत. ४० ते ५० वयोगटात ६ उमदेवार आहेत. ५० ते ६० वयोगटात ३ उमेदवार आहेत. साठी पार केलेले दोन उमदेवार आहेत


### पक्षांच्या उमेदवाराचा प्रचार सुरू, अपक्ष चिन्ह मिळेपर्यंत शांत

शहरात प्रमुख पक्षांच्या प्रचाराला सुरुवात केली आहे. दुचाकी रॅली, प्रचार भेटी, प्रभागात गाठीभेटी घेऊन, पत्रके वाटून ते प्रचार करत आहेत. मात्र निवडणुकीत उतरलेल्या अपक्षांची अडचण झाली आहे. २६ नोव्हेंबर रोजी त्यांना अधिकृत चिन्ह मिळणार आहे. त्यानंतर अवघ्या पाच दिवसांत त्यांना आपली निशाणी मतदारांपर्यंत पोहोचवावी लागणार आहे.

दरम्यान, नगराध्यक्षपदासाठी १९ उमेदवार रिंगणात आहे. या उमेदवारांपैकी एक उमेदवार अशिक्षित आहे, तर १३ उमदेवार हे बारावीपर्यंत शिकलेले आहेत. तिघांचे शिक्षण हे पदवीपर्यंत झाले असून चार उमदेवार पदव्युत्तर पदवीपर्यंत झालेले आहेत. निवडणुकीच्या रिंगणात अशिक्षित, निवृत्त नायब तहसीलदार, डॉक्टर आणि इतर शाखांमधील उच्चशिक्षित रिंगणात आहेत.बीड नगरपालिका ही जिल्ह्यातील एकमेव अ वर्ग नगरपालिका आहे. जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणची ही नगरपालिका असून २६ प्रभागांतून ५२ नगरसेवक निवडून येतात. जिल्ह्यातील सर्वाधिक नगरसेवक संख्या असलेली ही नगरपालिका आहे. स्थापनेपासून पहिल्यांदाच एससी प्रवर्गातील महिलेला नगराध्यक्षपद राखीव झाले आहे. पालिकेत नगराध्यक्षपदासाठी १९ उमेदवार रिंगणात आहेत. १ लाख ८० हजार मतदारांच प्रतिनिधित्व करण्याची इच्छा असलेल्या या उमेदवारांच्या शैक्षणिक स्थितीची माहिती शपथपत्रातून समोर आली आहे. राष्ट्रवादी. काँग्रेसच्या उमेदवार प्रेमलता पारवे यांचे शिक्षण बारावी असले तरी त्या तलाठी, मंडळ पदावर काम करून नंतर नायब तहसीलदार म्हणून निवृत्त झालेल्या आहेत. तर भाजप उमेदवार डॉ. ज्योती घुमरे यांनी एमबीबीएसनंतर भूलतज्ज्ञ म्हणून पदविका शिक्षण घेतलेले आहे. अपक्ष दिव्या स्वामी, काँग्रेसच्या करुणा मस्के या. पदव्युत्तर पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या आहेत. अपक्ष विद्या मस्के या कायद्यांच्या पदवीधारक आहेत.

## पंकजा मुंडेंच्या पीएच्या पत्नीची आत्महत्या

### कुटुंबाचा हत्येचा आरोप; मामाने सांगितले धक्कादायक कारण



बीड , (दिव्य न्युज):- पंकजा मुंडेचे पीए अनंत गर्जे यांच्या पत्नीने आत्महत्या केली आहे. ही आत्महत्या नाही तर हत्या असल्याचा आरोप गर्जे कुटुंबावर आत्महत्या केलेल्या तरुणीच्या कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल व्हावा यासाठी मुलीचे कुटुंबीय वरळी पोलिस ठाण्यात ठाण मांडून बसले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री अनंत गर्जे यांच्या पत्नीने आत्महत्या केली. काही महिन्यापूर्वीच त्यांचे लग्न झाले होते.आत्महत्या तरुणीच्या मामाने एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले की, काल दुपारी एक वाजल्यापासून त्यांची भांडणं सुरू होती. अनंत गर्जेचे बाहेर संबध होते. हे तिला माहिती होतं. तिने त्याकडे दुर्लक्ष केलं. तिने त्याचे चॅटींग देखील पाहिले होते. ते तिच्या वडिलांना पाठवून ठेवले होते. अनंत ▶▶ पान २ वर

## बीडमध्ये आ.सना मलिक यांचा मोबाईल पळवला

### पोलिसांना कळवताच चोराने लढवली शक्कल

बीड, (दिव्य न्युज):-नगर पालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी राष्ट्रवादीच्या मुंबई अनुशक्ती नगर मतदारसंघाच्या आमदार सना मलिक ह्या दोन दिवस बीड दौऱ्यावर आल्या होत्या. यात त्यांनी शुक्रवारी दिवसभर प्रचार केला आणि शनिवारी बीड मधील काही भागात प्रचार सभा घेतल्या.

बीड शहरातल्या गांधी नगर भागात दाखल होत येथील प्रचार ऑफिसच्या उद्घाटन समयी आमदार सना मलिक यांचा फोन चोरीला गेल्याची घटना घडली. त्यानंतर आमदार यांचे स्वीय सहाय्यक यांनी तात्काळ सायबर विभागाला पान २ वर

## प्रभाग क्रं. २४मध्ये तुतारीचा जोरदार आवाज

### प्रभागाच्या विकासासाठी दोन्ही उमेदवारांना निवडून देण्याचे मतदारांचे वचन





बीड, (दिव्य न्युज):- शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून प्रभाग क्रं.२४ मध्ये शेख अफसर शेख मोहंमद आणि जोया आनम मोहंमद मसियुद्दीन यांना अधिकृत रित्या पक्षाने उमेदवारी दिली आहे. येणाऱ्या २ तारखेला तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड ▶▶ पान २ वर

## आ.सना मलिकच्या रॅलीपासून पंडित कुटूंब चार हात दुरच



बीड, (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या घड्याळ चिन्हांवरील उमेदवार प्रेमलता दादाराव पारवे यांच्या प्रचारासाठी स्टार प्रचारक मुंबईच्या आमदार सना मलिक ह्या दोन दिवस बीड शहरात होत्या. त्यांनी शहरात कॉर्नर सभा आणि प्रचार रॅली देखीलकेल्या. परंतु मलिक यांच्या रॅली आणि कॉर्नर बैठकीपासून संपूर्ण पंडित कुटूंब दूर होतं. त्यांच्या कुटुंबातील कोणीच त्यांच्याकडं फिरकलं देखील नाही. त्यामुळं उलट सुलट चर्चांना उधान आलं आहे. बीड शहरात १ लाख ▶▶ पान २ वर

# माजलगावची बुखारी शाळाही चौकशीच्या फेऱ्यात

## बोगस शिक्षक भरतीसह कोट्यावधींचे काढलेले थकीत वेतन भोवणार, पदे वाढवून केला महाघोटाळा

**माजलगाव, (दिव्य न्युज):- माजलगाव येथील बुखारी उर्दू प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस शिक्षक भरती करण्यात आलेली आहे, असे समोर येत आहे. एवढेच नव्हे तर या ठिकाणी करोडो रुपयाचे थकीत वेतनही काढण्यात आल्याचा संशय आहे. त्यामुळेच या शाळेची लवकरच सखोल चौकशी होवून कडक कारवाई होणार असल्याचे शिक्षण विभागातील सुत्रांनी सांगितले आहे.**

बोगस शिक्षक भरतीचे प्रकरण चांगलेच गाजत आहे. नुकतेच या प्रकरणात दोन शिक्षणाधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यानुसारच या संस्थेनेही बोगस शिक्षक भरती केलेली आहे, त्यांनी मागील तारखेमध्ये नियुक्ती हस्तगत करून त्या तारखेपासून आजपर्यंतचा थकीत वेतन पगार काढल्याचे सांगितले जात आहे. घोटाळेबाजांनी यातून सरकारच्या तिजोरीवरती डल्ला मारलेला आहे, त्यामुळेच लवकरच सदरील शाळेतील -संस्थाचालक व मुख्याध्यापक जाळ्यामध्ये अडकण्याची चर्चा सुरू आहे. या बुखारी उर्दू शाळेमध्ये अनेक शिक्षकांनी मोफतमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण दिलं, परंतु त्यांना बाजूला काढण्यात आले आहे, ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांनीच या ठिकाणी शिक्षक म्हणून संबंधित संस्था चालकाला पैसे देऊन नियुक्त घ्यायच्या असे शिकवण्याची ज्यांच्यामध्ये कला आहे, जे हशार आहेत, अशा गरीब शिक्षकांना नोकरी मिळू शकली नाही, ज्यांना विद्यार्थ्यांना काहीही शिकवता येत नाही, अशांना या ठिकाणी नोकरी देण्यात ▶▶ पान २ वर

### एका शिक्षकामागे कमावले ७५ लाख

या शाळेत मोठ्या प्रमाणात बोगसपणे भरती करण्यात आली आहे. एका शिक्षकामागे जवळपास ७५ लाख रूपये कमविण्यात आल्याचेही शिक्षण विभागातून सांगितले जात आहे. शाळा आणि शिक्षणाधिकारी यांच्यात दुवा साधून एका तात्कालिन गटशिक्षणाधिकाऱ्याने हे कांढ केलेले आहे

### एकाच पदांवर डबल डबल नियुक्त्या

एकाच पदांवर डबल डबल नियुक्त्या दिल्याचा प्रकार बुखारीसह जिल्ह्यातील इतर अल्पसंख्याक शाळेत घडलेला आहे. हा सगळा प्रकार २०१२ पासून चाललेला आहे. त्यामुळे याचीही चौकशी होणे आवश्यक आहे.

### शेवटी सत्याचा विजय होणार

या शाळेचे संस्थाचालक व शाळेतील शिक्षक हे शिक्षक भरती घोटाळ्यासंदर्भात तक्रार सादेक इनामदार यांच्याविषयी चुकीची चर्चा करत होते, मात्र इनामदार यांच्या म्हणण्यानुसारच या शाळेतील बोगसगिरी उघडकीस येत आहे. त्यामुळेच शाळेवर कारवाई होण्याचे संकेत व्यक्त केले जात आहे. इंजि सादिक इनामदार यांनी इमाने इतबारे काम करून कोणाच्याही आमिषाला, दबावाला व अमिषाला बळी न पडता सदरील प्रकरणासोबत झुंज दिली, हुकूमशाही व राजकीय दबावाला नजुमानता लोकशाहीचा लढा उभा केला व त्या लढ्याला आता खऱ्या अर्थाने यश येत असल्याचे दिसून येत आहे.

# पानटपरीवाल्यांनो, गुटखा विकताना सापडला तर थेट मकोका लागणार-मंत्री झिरवाळ



मुंबई , (दिव्य न्युज):- गुटखाबंदी असतानाही परराज्यातून येणारा अवैध गुटखा व त्याचे शालेय विद्यार्थी व तरुण पिढीवर होणारे गंभीर दुष्परिणाम रोखण्यासाठी संबंधित गुटखा कंपनीच्या मालकांवर आणि या अवैध व्यवसायातील सूत्रधारांवरच 'मोका' कायद्यान्वये कारवाई करण्यात येणार आहे. राज्यात छुप्या पद्धतीने गुटखा विक्री करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याचा निर्णय

अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी घेतला आहे.

गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू व सुपारी, खर्रा, मावा यासारख्या प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन व विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली दोन दिवसांपूर्वी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर अन्न आणि औषध प्रशासन मंत्रालयाने उपरोक्त निर्णय घेतला आहे.बनावट सुपाऱ्या बनवून गुटखा निर्मिती होत आहे. तसेत माणसे जाळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लाकडाला सुपारीचा आकार देऊन त्याला रंग आणि केमिकल वापरून सुगंधित केले जात असल्याचेहीयापुढच्या काळात राज्यात गुटखाबंदीची राज्यात कडक अंमलबजावणी होईल. त्यासाठी या व्यापारातील सूत्रधारांना 'मकोका' लावून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. गुटखाबंदी विरोधात जिल्हास्तरावर विविध विभागांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# प्रभाग २१ मध्ये राष्ट्रवादीचा प्रचंड झंझावात

## बाळासाहेब गुंजाळ यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही उमेदवारांना विक्रमी आघाडीची चिन्हे

**बीड (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सक्षम नेतृत्वावर प्रभाग २१ मधील नागरिकांनी पुन्हा एकदा मोठा विशास दाखवला असून, या प्रभागात राष्ट्रवादीचा झंझावात इतका जोरदार आहे की संपूर्ण वातावरण एकतर्फी होत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. विकासाचे शिल्पकार, जनसेवेचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे सन्माननीय नगरसेवक धर्मराज (बाळासाहेब) लक्ष्मण गुंजाळ यांच्या कार्यकाळात प्रभागात झालेल्या विकासकामांची दणदणीत छाप पडली आहे. रस्ते, गटारे, प्रकाश व्यवस्था, पाणीपुरवठा, सार्वजनिक सोयीसुविधा, तसेच नागरिकांच्या छोट्या-मोठ्या प्रश्नांवर तात्काळ प्रतिसाद-या सर्व गोष्टींनी प्रभाग २१ चा चेहरामोहरा बदलला आहे.**

पायल दत्ता जाधव यांच्या प्रचाराला प्रचंड वेग प्रभाग क्रमांक २१ (अ) मधील उमेदवार सौ. पायल दत्ता जाधव यांना मिळणार्या वाढत्या प्रतिसादामागे त्यांच्या पती दत्ता जाधव यांचा मोठा आणि प्रभावी जनसंपर्क हा मजबूत आधारस्तंभ ठरत आहे. प्रभागातील प्रत्येक छोट्या-मोठ्या कामात, नागरिकांच्या दैनंदिन अडचणींमध्ये ते नेहमीच आघाडीवर राहिले. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत-बोललं की दत्ता जाधव ताबडतोब उभा असतो अशी त्यांची ओळख वर्षानुवर्षांच्या कामातून निर्माण झाली आहे. सर्वसामान्यांचा खरा सोबती, बोलका आणि तात्काळ काम करणारा तरुण म्हणून त्यांना संपूर्ण प्रभागात मोठा मान आहे. त्यांच्या या व्यापक लोकसंपर्कामुळे पायलताईंच्या प्रचाराला अभूतपूर्व गती मिळाली आहे वङ्घराघरांतून मोठा प्रतिसाद उसळत आहे. विकासकामी नेतृत्व आणि सर्वसमावेशक भूमिका प्रभाग क्रमांक २१ (ब) मधून घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवणारे मा. धर्मराज (बाळासाहेब) लक्ष्मण गुंजाळ यांच्या कार्यामुळे प्रभागातङ्गगेल्या काही वर्षांत मोठा विकास साध्य झाला आहे. विशेष म्हणजे-जाती-धर्माच्या चौकटीच्या बाहेर राहून सर्वङ्गसमाजाच्या सेवेसाठी काम करणारे नेते म्हणून बाळासाहेब गुंजाळ आणि दत्ता जाधव या दोघांचीही ओळख भक्कम आहे. त्यांच्या सहकार्यांनाही हीच सर्वसमावेशकता आणिङ्गविकासप्रधान विचारधारा मार्गदर्शक ठरते. विजयाची चर्चा आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाची लाट घराघरांतून उमटत असलेल्या जनसमर्थनामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्हीङ्गउमेदवारांना विक्रमी आघाडी मिळणार असल्याची चर्चाङ्गप्रभागात जोर धरत आहे. कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह असून, या वेळी प्रभाग २१ राष्ट्रवादीला इतिहासात नोंदवला जाईल अशी विशाल आघाडी देणार! असा ठाम विशासव्यक्त केला जात आहे.

# वडवणी ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम अर्धवट अवस्थेत रखडले!

## बांधकामाकडे जाणारा रस्ता शेतकऱ्याने अडवला



वडवणी , ( दिव्य न्युज):-वडवणी तालुक्यासाठी ग्रामीण रुग्णालयाची मंजुरी मिळुन ही जागे अभावी गेल्या अनेक वर्षापासून इमारतीचे बांधकाम रखडले होते. पण काही दिवसापूर्वी चाटे नावाच्या शेतकऱ्याने जागा उपलब्ध करून देत ग्रामीण रुग्णालयासाठी जागेचे दानपत्र दिले होते .आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या उपस्थितीत स्वत:ची जमीन दवाखान्याच्या बांधकामासाठी दान केली आणि त्या जागेवर ग्रामीण रुग्णाललयाची नवीन इमारतीचे भूमिपूजन माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या उपस्थितीत मध्ये मोठ्या थाटामाटामध्ये पार पडले होते.

परंतु आता त्याच आरोग्य केंद्राचे बांधकाम रखडलेल्या अवस्थेत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्या मागचे कारण दवाखान्याकडे जाण्यासाठी रस्ताच उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. काही शेतकऱ्यांनी माझ्या वैयक्तिक शेतातून रस्ता देणार नाही आशा स्पष्ट सूचनाच संबंधित गुत्तेदार व आरोग्य विभागास दिल्या असल्यामुळे संबंधित बांधकाम अर्धवट अवस्थेत रखडले असल्याचे पहावयास मिळत आहे. संबंधित घटने संदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांनी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांच्या नावाने रस्ता मिळवून देत हा गंभीर प्रश्न सोडवावा असे पत्रच उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना लेखी स्वरुपात दिले आहे. याविषयी आतापर्यंत प्रशासनाने कोणतेच ठोस पावले उचलले नसल्याचे निदर्शनास आले असून. संबंधित गुत्तेदाराने सर्व घटनेची माहिती वडवणी तहसीलदार , स्थानिक कार्यकर्त्यांना घटनेची माहिती दिली असून यावरती अजून काहीच तोडगा निघालेला नाही.वडवणी तालुक्यातील नागरिकांसाठी अतिशय महत्त्वाचे असलेले ग्रामिण रुग्णालयाच्या बांधकामास कोणीही आडकाठी करू नये अशी मागणी वडवणी तालुक्यातील नागरिकांमधून होत आहे.

आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी लक्ष घालावे.

वडवणी येथील ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम सुरू असून या बांधकामास आडकाठी करून बांधकाम थांबवण्याचे काम करू नये नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे जाणून-बुजून कोणी अडकाटी करत असेल तर त्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी देखील मागणी नागरिकांमधून होत आहे. वडवणी करांचा हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी मार्गी लावावा अशी देखील मागणी तालुक्यातील नागरिकांमधून होत आहे..

# आज वैष्णव पॅलेस येथे अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत व्यापारी मेळावा - अमर नाईकवाडे

## व्यापारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे



बीड, ( दिव्य न्युज):- बीड नगरपरिषदेच्या निवडणूक वातावरणाला वेग आला असताना, राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित दादा पवार यांचा बीड शहर दौरा अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. वैष्णव पॅलेस, बीड येथे आज सोमवार सायंकाळी ५ वाजता आयोजित व्यापारी मेळाव्यात अजित दादा पवार हे शहरातील व्यापारी बांधवांशी थेट संवाद साधणार असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा संवाद विशेष लक्षवेधी ठरणार आहे.

या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी पत्रकाद्वारे माहिती देताना सांगितले की, शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व ५३ उमेदवारांना बळकटी देण्यासाठी, तसेच व्यापारी बांधवांच्या विविध प्रश्नांना उत्तर देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर मार्गदर्शन करणार आहेत.हा व्यापारी मेळावा म्हणजे केवळ संवाद नव्हे, तर बीडच्या व्यापारी वर्गासाठी दिशा ठरवणारा निर्णायक टप्पा आहे. त्यामुळे शहरातील सर्व व्यापारी बांधवांनी, व्यावसायिक संघटनांनी तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

पान ४ वरून

## वडवणी तालुक्यातील

शेतकरी संघटनाद्वारे करण्यात आलं. ऊस दराच्या प्रश्नावरून बीड जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटना एकत्र येत आक्रमक पवित्रा घेत आहेत. बीड जिल्ह्यातील माजलगाव या ठिकाणी सोमवारी (दि. २४ नोव्हेंबर) ऊस दरासाठी होणाऱ्या अभूतपूर्व चक्काजाम आंदोलनात सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सहभागी व्हावं. ऊस तोड बंद ठेवून ऊस तोड आणि वाहतूक बांधवांनी सहकार्य करण्याचं तसंच संभाव्य नुकसान टाळण्याचं आवाहन ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीनं करण्यात आलं आहे. रविवारी शेतकऱ्यांनी वडवणी तालुक्यातील कवाडगाव येथे आपापल्या गावात टायर जाळून आंदोलनास पाठिंबा दर्शवाला आहे. गाळप हंगाम २०२५-२६ साठी बीड जिल्ह्यातील कोणत्याही कारखान्यानं केंद्र शासनानं घोषित केलेल्या एफआरपीप्रमाणं ऊस दर किती देणार? याबाबत कोणतंही भाष्य किंवा प्रसिद्धी पत्रक जाहीर केलेलं नाही. यामुळं उसाचे दर आणि त्या दरांची घोषणा याबाबत जिल्हाभरात ऊस उत्पादक शेतकरी आक्रमक झालाय. त्यामुळं तो रस्त्यावर उतरला आहे. या अनुषंगानं ऊस उत्पादक शेतकरी प्रतिनिधींनी जिल्हाभरातील जवळपास सर्वच साखर कारखान्यांची भेट घेऊन शेतकऱ्यांना एफआरपीप्रमाणं एक रक्कमी भाव मिळावा. तसंच यंदाच्या गाळप हंगामासाठी किती दर देणार? हे विचारण्यासाठी शिष्टमंडळ भेटलं. मात्र यातून अपेक्षित गोष्टी घडून आल्या नाहीत. म्हणून हा प्रश्न आणखी चिघळला आहे. या अनुषंगानं सोमवारी (दि. २४ नोव्हेंबर) माजलगाव येथील वसंतराव नाईक चौक, परभणी नाका या ठिकाणी जोपर्यंत प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत बेमुदत चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे.

## सरकारला नैतिक

आणि संविधानाच्या अस्तित्वासाठी घातक आहे. संसद गाजवणारा एक वक्ता दाखवा

अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, प्रमोद महाजन, सुषमा स्वराज, प्रकाश जावडेकर, अरुण जेटली यांच्या काळात भाजपा सुसंस्कृपणामुळे ओळखला जायचा, असे थेट नावांचा उल्लेख करती खासदार सुळे म्हणाल्या, मतभेद असतानाही राजकारणात सीमा ओलांडायची नसते, हे या संसदपटूंकडून शिकण्यासारखे होते. मात्र सध्याच्या भाजपाने या सुसंस्कृपणाची कास सोडली आहे. संसद गाजवणारा एकही वक्ता आज भाजपाकडे शिल्लक राहिलेला नाही. वागण्या- बोलण्यात मर्यादा ठेवणाऱ्या भाजपातला गोल्डन पिरियड संपला आहे. घराणेशाहीवर तोंडसुख घेणारे भाजपाच आज घराणेशाहीच्या दावणीला जुंपले गेले आहे.

पान १ वरून

## पंकजा मुंडेंच्या

सांगतोय की तिने माझ्यासमोर आत्महत्या केली. मात्र, आमचा विश्वास नाही. पोलिसांनी गुन्हा दाखल करावा. माझी बहीण, मुलीचे वडील कालपासून पोलिस ठाण्यात बसून आहे. सामान्य लोकांना न्याय मिळत नाही.

या घटनेनंतर पंकजा मुंडे यांनी आपले बीडमधील सर्व कार्यक्रम रद्द केल्याची माहिती आहे. दरम्यान, कुटुंबीय गुन्हा दाखल व्हावा यासाठी आग्रही आहेत. तर, आत्महत्या केलेल्या त्यांच्या मुलीच्या मृतदेह रुग्णालयात असून त्यावर पोस्टपार्टम केले जाणार आहे. पोस्टमार्टममधून सत्य बाहेर येईल, असे सांगितले जात आहे. दरम्यान, पोलिस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत.अनंत गर्जे यांचे लग्न फेब्रुवारी महिन्यात झाल्याची माहिती आहे. या लग्नाला स्वतः पंकजा मुंडे या देखील उपस्थित होते. मात्र, लग्नाच्या अवघ्या १० महिन्यांत त्यांनी अनंत गर्जेंच्या पत्नीने टोकाचे पाऊल उचलले. त्यांनी आत्महत्या केली नाही तर त्यांची हत्या झाली आहे, असे सांगत तिच्या माहेरच्या लोकांना वरळी पोलिस ठाण्याला घेरावा घातला. तसेच या प्रकरणी गुन्हा दाखल करून दोषींवर कारवाईची मागणी केली.

## बीडमध्ये आ.सना

कळवले.त्यानंतर एका तासाने तो मोबाईल एका लहान मुलाच्या हाताने पोलीस ठाण्यात पाठवून दिल्याची माहिती आमदाराचे स्वीय सहायक यांनी दिली. मात्र याबाबत तक्रार दाखल झाली नसल्याने गुन्हा दाखल झाला नाही आणि पुढे तपासही नाही. एवढा ताफा एवढी तत्परता असताना चक्क आमदार सना मलिक यांच्या फोनवर डल्ला मारला जात असेल तर सर्वसामान्य नागरिकांची काय अवस्था, असे या घटनेतून स्पष्ट दिसून येते.

## पानटपरीवाल्यांनो,

अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी घेतला आहे.

गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू व सुपारी, खर्रा, मावा यासारख्या प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन व विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली दोन दिवसांपूर्वी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर अन्न आणि औषध प्रशासन मंत्रालयाने उपरोक्त निर्णय घेतला आहे.

बनावट सुपाऱ्या बनवून गुटखा निर्मिती होत आहे. तसेत माणसे जाळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लाकडाला सुपारीचा आकार देऊन त्याला रंग आणि केमिकल वापरून सुगंधित केले जात असल्याचेहीयापुढच्या काळात राज्यात गुटखाबंदीची राज्यात कडक अंमलबजावणी होईल. त्यासाठी या व्यापारातील सूत्रधारांना 'मकोका' लावून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. गुटखाबंदी विरोधात जिल्हास्तरावर विविध विभागांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

## माजलगावची बुखारी

गोरगरीब कित्येक शिक्षकांसोबत घडले आहे. विद्यार्थ्यांना मुलांचे जीवन उद्ध्वस्त करण्याचं काम हे या संस्थेच्या लोकांनी व मुख्याध्यापकांनी केलेला आहे, ज्यावेळेस बुखरी उर्दू शाळेला अनुदानित नव्हती त्यावेळेस पासून अनेक शिक्षकांनी मोफत मध्ये सुविधा दिल्या परंतु ज्यावेळेस याला अनुदान आलं त्यांना या ठिकाणी हाकलून देण्यात आल्याचा प्रकारही घडलेला आहे, त्या शिक्षकांवर संस्थाचालकांनी अन्याय केलेला आहे. यावर लवकरच कारवाई होणार आहे असे शिक्षण विभागातून सांगितले जात आहे. त्यामुळेच आता या शाळेतून नेमके काय काय बाहेर येते आणि कोणा-कोणावर कारवाई होते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे. विशेष म्हणजे या शाळेतील बोगसगिरीकडे सामाजिक कार्यकर्ते सादेक इनामदार यांच्यासह शिक्षणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणी माजलगावमधून केली जात आहे.

## आ.सना मलिकच्या

८० हजार मतदार आहेत. त्यापैकी मुस्लिम समाजाची ६३ हजार मते आहेत. मुस्लिम समाजाची मते आपल्याला मिळावी म्हणून एमआयएम, अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी जीव तोडून प्रयत्न करताना दिसत आहेत. त्यांच्यात मुस्लिम मतांसाठी प्रचंड रस्सीखेच सुरू आहे. मुस्लिम मतांचा आपल्याला फायदा व्हावा, म्हणून अजित पवारांच्या राष्ट्रवादीने स्टार प्रचारक आ.सना मलिक यांची बीड शहरात रॅली काढण्यात आली. अनेक ठिकाणी त्यांच्या कॉर्नर बैठका झाल्या. त्यांच्या रॅली अन् सभांना मोठा प्रतिसाद मिळाला. परंतु बीडकरांच्या नजरेतून एक गोष्ट सुटली नाही. ती म्हणजे पंडित कुटुंब या रॅलीत कुठंच नव्हतं. पंडित कुटुंबातील आ. विजयसिंह पंडित, माजी आ. अमरसिंह पंडित यांच्याकडे बीडची जबाबदारी देण्यात आलेली आहे. मात्र पक्षाचा जबाबदार व्यक्ती सना मलिक यांच्या कुठल्याच कार्यक्रमांना हजर नव्हते. त्यामुळे बीडमध्ये उलट - सुलट चर्चेला उधान आले आहे. एरव्ही बारामतीच्या पवार कुटुंबातील कुत्रं जरी बीडमध्ये आलं तरी ते आधी पंडितांच्या शिवछत्रवरं पाहुणचाराला असतं. पण आ. सना मलिक यांच्यासाठी मात्र शिवछत्रची दारं बंद असल्याचं दिसून आलं, अशी चर्चा बीडमध्ये रंगली आहे.

आशियाना हॉटेलमध्ये चहा पिला

सना मलिक यांनी पहिल्या दिवशी कार्यकर्त्यांच्याच घरी जेवण केलं. चहा देखील आशियाना हॉटेलमध्ये पिला. रात्रीचा त्यांचा मुक्काम बीडच्या हॉटेल ग्रॅंड यशोदामध्ये होता. मुळात मुस्लिम समाजातील स्त्रीयाचं स्थान याविषयी अनेकदा बोललं जातंय. पण दुसरीकडे सना मलिक यांना थेट आशियाना हॉटेलमध्ये नेऊन चहा पाजायला नको होता, अशा प्रतिक्रीया मुस्लिम समाजातून उमटत आहेत. इकडे आ. सना मलिक यांच्या जातीचीं मते पंडितांना हवी आहेत. परंतु मुस्लिम महिला लिडर शहरात आल्या तर ते त्यांना नकोय, अशाही चर्चा बीड शहरात सुरु आहेत.